जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या., बुलडाणा (अवसायनात) या संस्थेची जागा छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक सभागृहाकरीता नगर परिषद, बुलडाणा यांना हस्तांतरीत करण्याबाबत

महाराष्ट्र शासन

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग,

शासन निर्णय क्रमांक :- एलडीबी १०२३/प्र.क्र.३२२/७-स

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक : २७ ऑगस्ट, २०२६

प्रस्तावना :-

बुलडाणा जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या., बुलडाणा (अवसायनात) या बँकेच्या बुलडाणा शहरातील जागेपैकी काही जागा नियोजित छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक सभागृहाकरिता नगर परिषद, बुलडाणा यांना हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या दि. २५.०६.२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाने मान्यता दिली आहे. सदर मान्यतेनुसार बुलडाणा जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या., बुलडाणा (अवसायनात) या संस्थेच्या ताब्यातील काही जागा नियोजित छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक सभागृहाकरिता नगर परिषद, बुलडाणा यांचेकडे हस्तांतरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

बुलडाणा जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या., बुलडाणा (अवसायनात) या संस्थेच्या बुलडाणा शहरातील ३०,००० चौ. फूट भुखंडापैकी सहकार विभागाच्या ६ कार्यालयांसाठी ८,३८७ चौ. फूट व वाहन पार्किंगसाठी ३००० चौ. फूट अशी ११,३८७ चौ. फूट जागा वगळून उर्वरीत १८,६१३ चौ. फूट जागा बुलडाणा नगर परिषदेकडे हस्तांतरीत करण्यास खालील अटींवर मान्यता देण्यात येत आहे-

अ) सदर भुखंडावर सहकार विभागाच्या ६ कार्यालयांसाठी आवश्यक असलेल्या ८,३८७ चौ. फूट जागेवरील इमारतीचे बांधकाम, फर्निचर व विद्युतीकरण बुलडाणा नगर परिषदेने करुन दयावे.

ब) सदर ३०,००० चौ. फूट भूखंडाचे निश्चित केलेले मूल्य रु. ५.९८ कोटी व सहकार विभागास आवश्यक असलेल्या ११,३८७ चौ. फूट जागेचे मूल्य रु. २.२७ कोटी यामधील फरकाची रक्कम रु. ३.७१ कोटी इतकी रक्कम बुलडाणा नगर परिषदेने बुलडाणा जिल्हा सहकारी कृषी ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या. बुलडाणा (अवसायनात) या संस्थेस अदा करावी.

२. शासन निर्णयातील उपरोक्त बाबींचे संनियंत्रण करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०८२७१८२८५४०८४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANJUSHA MANDAR SALVI

Digitally signed by MANJUSHA MANDAR SALVI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=5F3FD7897FEA9717DD9115F782C19536AFEE03D1736A0283493A8863FADEBB45, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2A02139FD3AC94FCBACD18386C5C6655556F2E876E9782822225D5F1AA558DEC, cn=MANJUSHA MANDAR SALVI
Date: 2026.08.27 18:30:44 +05'30'

(मंजुषा साळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.उप मुख्यमंत्री (रा.उ.शु.,क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक कल्याण आणि औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
४. मा. मंत्री (सहकार) /मा.राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.
५. मा. विधानसभा सदस्य / विधान परिषद सदस्य (सर्व)
६. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव.
७. मा. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
८. मा.अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
९. मा.प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१०. जिल्हाधिकारी, बुलडाणा,
११. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे
१२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलडाणा
१३. मुख्याधिकारी, नगरपरिषद बुलडाणा
१४ . निवड नस्ती.